**इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी.**
(जिल्हा- कोल्हापूर)
कार्यालय - महानगरपालिका कार्यालय,इचलकरंजी.
फोन नं.- ०२३० २४२१४५१ ते २४२१४५५
EMAIL: ichalkaranjinp@gmail.com

जा. क्र. इमपा/आस्था.व सा.प्र.वि./ ०७ / ८५४ /२०२५.   दिनांक : २८.१०.२०२५

## नियुक्ती पत्र

विषय : कंत्राटी / करार पद्धतीने शहर समन्वयक भरतीबाबत

संदर्भ : मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे दिनांक १३.१०.२०२५ चे मंजुरी आदेश

मा.राज्य अभियान संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील क्र. राअस/शहर समन्वयक /२१४/२३-२४, दिनांक:- २३.०२.२०२४ चे पत्रान्वये म.न.पा. करिता कंत्राटी तत्त्वावरील शहर समन्वयक (City Co-ordinator) पद भरतीची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर करणेस खालील विहित अटीस अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे. या अनुषंगाने कंत्राटी / करार पद्धतीने शहर समन्वयक भरतीकरिता मा.अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील आणि मा.उपायुक्त व मा.शहरअभियंता सदस्य असलेल्या समितीमार्फत दिनांक ०८.१०.२०२५ रोजी मुलाखत प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

मुलाखतीअंती उपरोक्त निवड समितीच्या शिफारसीनुसार व मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे उपरोक्त संदर्भिय मान्यतेस अनुसरून खालील उमेदवारांची, शहर समन्वयक पदी संबंधित उमेदवारांचे रुजू दिनांकापासून ११ महिने मुदतीकरिता कंत्राटी / करार पद्धतीने मानधनावर नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | सुशांत बळवंत बोरे | शहर समन्वयक |
| २ | विपुल सुनिल अपराध | शहर समन्वयक |

उपरोक्त नियुक्ती खालील विहित अटींस अधीन राहून करण्यात येत आहे.

१. सदर कंत्राटी / करार पद्धतीने करण्यात आलेली नियुक्ती रुजू दिनांकापासून ११ महिन्यांकरीता राहील.

२. कंत्राटी शहर समन्वयक (City Co-ordinator) यांना रूपये ४५,०००/- (रुपये पंचेचाळीस हजार फक्त) एवढे मानधन अनुज्ञेय राहील. सदर मानधन संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला प्राप्त वित्त आयोगाच्या निधीमधून/ हागणदारी मुक्त शहरास प्राप्त झालेल्या प्रोत्साहन अनुदानातून/स्वच्छ सर्वेक्षणाच्या बक्षिस रक्कमेमधून / क्षमता बांधणी अनुदानातून अथवा स्वनिधीमधून देण्यात येईल.

३. कंत्राटी शहर समन्वयक यांना कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत. तसेच त्यांना कोणत्याही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत.

४. कंत्राटी पध्दतीने नियुक्त शहर समन्वयक यांना शासनाच्या सर्व प्रचलित नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

५. नियुक्तीच्या मुदतीत कामकाजाचे मूल्यमापन करून कामकाज समाधानकारक असेल तर आणि आवश्यकतेनुसार पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येईल आणि यासंबंधी मा. आयुक्त यांचे निर्णय अंतिम असतील.

६. कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे उमेदवारास म.न.पा. / शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल. तसेच यासाठी कोणताही दावा / वाद निर्माण करता येणार नाही.

७. मा.आयुक्त यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार असतील.

८. सोपविण्यात आलेले कामकाज / सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात संबंधित उमेदवार गुंतलेला असणार नाही किंवा त्याचे कोणतेही हितसंबंध असणार नाहीत.

९. कोणतेही Conflict of Interest ( हितसंबंध) असल्यास ते जाहीर करण्याची उमेदवाराची जबाबदारी असेल.

१०. सोपविण्यात आलेल्या कामकाजाशी संबंधित प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत पूर्णत: गोपनीयता पाळण्याची व सोपविण्यात आलेले कामकाज निश्चित कालावधीत पूर्ण करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. तसेच कामकाजाबाबत, नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूल्यमापन करतील.

११. मा.राज्य अभियान संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडीलदिनांक २३.०२.२०२४ चे पत्रातील निर्देशानुसार मासिक रक्कम रु. ४५,०००/- इतके मानधन देय असेल.

१२. वरीलपैकी कोणत्याही अटी / शर्तीचा भंग झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल. त्यामुळे उक्त कोणत्याही अटी / शर्तींचा भंग होणार नाही याची दक्षता संबंधित उमेदवाराने घ्यावयाची आहे.

Digitally signed by
Rahul Sarjerao Mardhekar
Date: 29-10-2025
15:51:17

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

(राहुल मर्ढेकर)
प्र.अति.आयुक्त,
इचलकरंजी महानगरपालिका.

प्रति,
वरील संबंधिताना

/- प्रस्तुतचे नियुक्ती पत्र मिळाले दिनांकापासून सात दिवसांचे आत, घन कचरा व्यवस्थापन विभागाकडे रुजू होवून संबंधित विभागप्रमुख यांचेमार्फत रुजू अहवाल सादर करण्याकरिता तसेच संबंधित विभागप्रमुख यांचेकडे उक्त अटी / शर्ती मान्य असल्याबाबत विहित किमतीच्या मुद्रांकावर बंधपत्र लिहून देण्याकरिता . .

**प्रत -**

विभागप्रमुख, घन कचरा व्यवस्थापन विभाग

/- यांना, वरील संबंधिताना रुजू करून घेवून, त्यांचेकडून उक्त अटी / शर्ती मान्य असल्याबाबत विहित किमतीच्या मुद्रांकावर बंधपत्र लिहून घेणे तसेच संबंधितांचे मासिक मानधन पत्रक तयार करणेकरिता . .

**प्रत माहिती व जरूर त्या कार्यवाहीसाठी –**

मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
मुख्य लेखापरीक्षक,
निवड नस्ती ( आस्था.व सा.प्र.विभाग)

**प्रत माहितीस्तव सादर –**

मा.आयुक्त तथा प्रशासक,
मा.अति.आयुक्त
उपायुक्त (सर्व)

नोट : नियुक्ती झालेल्या उमेदवारांनी आस्थापना / व सामान्य प्रशासन विभागाशी संपर्क साधून नियुक्ती पत्र प्राप्त करून घेऊ घ्यावे